I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S. (पोलीस ठाणे):** महाबळेश्वर **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0112 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/11/2025 07:53 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** बुधवार **Date from (दिनांक पासून):** 26/11/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 26/11/2025

**Time Period (कालावधी):** प्रहर ६ **Time From (वेळेपासून):** 17:00 तास **Time To (वेळेपर्यंत):** 17:15 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 27/11/2025 **Time (वेळ):** 07:00 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 007 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 27/11/2025 07:52 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पश्चिम, 01 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** पंचायत समिती महाबळेश्वर,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** सुप्रिया सुभाष गावडे

**(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

**(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1992

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

**(h) Occupation (व्यवसाय):**

**(i) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, , सातारासातारा, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, , सातारासातारा, महाराष्ट्र, भारत |

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-7758082005

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुनिल संभाजी पारठे | | वडील चे नाव : संभाजी पारठे | 1. 8/2,अंबिका हौसोसायटी,Town/Village (शहर / गाव): महाबळेश्वर,Tehsil (तहसील): महाबळेश्वर,Police Station (पोलीस ठाणे): महाबळेश्वर,District (जिल्हा): सातारा,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | ओंकार संतोष जाधव | | वडील चे नाव : संतोष जाधव | 1. Town/Village (शहर / गाव): चिखली महाबळेश्वर,Tehsil (तहसील): महाबळेश्वर,Police Station (पोलीस ठाणे): महाबळेश्वर,District (जिल्हा): सातारा,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

**11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

| **S. No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.)** |
| --- | --- |

**12.** **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

खबरी जबाब दिनांक 27/11/2025

मी सुप्रिया सुभाष गावडे वय- 33 वर्षे, पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा मो.नं.7758082005.

समक्ष महाबळेश्वर पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देते की,मी दिनांक 24/11/2025 रोजी ॲन्टी करप्शन ब्यूरो, सातारा कार्यालयात हजर असताना, मला पोलीस उप अधीक्षक राजेश वाघमारे यांनी त्यांचे कक्षात बोलावुन घेवून समक्ष हजर असले तक्रारदार श्री.विनोद भिमराव खाडे वय-48 वर्षे व्यवसाय-ग्रामपंचायत अधिकारी, भिमनगर महाबळेश्वर रा.दहिवडी रोड,वडुज ता.खटाव जि.सातारा.यांची ओळख करून देवून,त्यांची लाचे संदर्भात तक्रार असल्याचे सांगुन,त्यांचे तक्रारीवर कारवाई करणेसाठी पंच उपलब्ध करून घेवुन पुढील कारवाई करणेबाबतचा आम्हास मुखशील आदेश दिला,तसेच पोहवा/1069 गोगावले पोहवा/1869 राजपुरे, पोहवा/2028 चव्हाण, पोकॉ/443 देशमुख खाजगी वाहन महिंद्रा टीयुव्ही क्रमांक एमएच 12 एमएल 9828 व चालक अमोल वसंत यादव हे मदत कामी दिले असल्याचे सांगितले. त्यानंतर मी लागलीच मा.अधीक्षक,राज्य उत्पादन शुल्क,सातारा यांचे कार्यालयातून लेखी रिपोर्टने दोन कर्मचारी यांची मागणी करून दोन शासकीय पंच बोलावून घेतले. त्यानुसार दि.24/11/2025 रोजी 14.00 वाजता दोन पंच एसीबी कार्यालय, सातारा येथे 1. श्री राजु ईश्वरा शिंदे,लेखपाल, नेमणुक राज्य उत्पादन शुल्क, विभाग, सातारा , 2. श्री. सचिन दशरथ देशमुख, वरीष्ठ लिपिक, नेमणुक राज्य उत्पादन शुल्क, विभाग, सातारा हे पंच म्हणुन उपस्थित राहीले त्यांची व तक्रारदार खाडे यांची ऐकमेकांना ओळख करून दिली. तसेच सापळा पथक यांचेशी ओळख करून दिली. त्यानंतर मी पंच साक्षीदार यांना तक्रारदार श्री विनोद भिमराव खाडे यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून त्यांची तक्रार नोंदवून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणे आहे त्याकामी आपण पंच साक्षीदार म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता त्यास नमुद दोन्ही पंच साक्षीदार यांनी होकार दिला. त्याप्रमाणे पंच क्र.1 म्हणून श्री राजु ईश्वरा शिंदे, पंच क्र.2 म्हणून श्री. सचिन दशरथ देशमुख हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार यांना त्यांची तक्रारी बाबत विचारणा करता प्रथम त्यांनी तोंडी तक्रार कथन केली व नंतर लेखी स्वरुपात दिली ती पुढीलप्रमाणे.मी वरील ठिकाणचा कायमचा रहिवाशी असून मी पंचायत समिती कार्यालय, महाबळेश्वर अंतर्गत ग्रामपंचायत भिमनगर ता.महाबळेश्वर येथे ग्रामपंचायत अधिकारी म्हणून तीन वर्षापासून कार्यरत आहे. माझे लगतचे वरिष्ठ अधिकारी हे श्री.सुनिल पारठे, विस्तार अधिकारी असून गटविकास अधिकारी श्री. विभुते हे पंचायत समिती महाबळेश्वर येथे माझे वरीष्ठ अधिकारी आहेत.ग्रामपंचायत अधिकारी अंतर्गत विविध विकास कामांसाठी शासन स्तरावरून येणाऱ्या निधीतून विकास कामे करून केले कामाचा अहवाल विस्तार अधिकारी (पंचायत), व गट विकास अधिकारी, महाबळेश्वर यांना सादर करीत असतो.

मी दिनांक 19/11/2025 रोजी पंचायत समिती, महाबळेश्वर कार्यालयात गेलो असता पंचायत

समिती, महाबळेश्वर कार्यालयातील माझे वरीष्ठ सुनिल संभाजी पारठे, विस्तार अधिकारी यांचेशी माझी कामानिमीत्त चर्चा झाली. त्यावेळी त्यांनी मला माझे वरील भिमनगर ग्रामपंचायत व्यतिरिक्त दुसऱ्या ग्रामपंचायतीचा अतिरिक्त चार्ज देणार असलेबाबत सांगितले. त्यावेळी मी त्यांना सोनाट ग्रामपंचायतीचा अतिरिक्त चार्ज दया असे म्हणालो असता त्यांनी मला सांगितले की, त्यांचे बीडीओ श्री विभुते साहेबांशी चांगले संबंध आहेत. त्यांना सांगून मला सोनाट ग्रामपंचायत ता.महाबळेश्वर या ग्रामपंचायतीचा ग्रामपंचायत अधिकारी या पदाचा अतिरिक्त चार्ज सोईस्करपणे देण्याकरिता बीडीओ साहेबांना शिफारस करतो असे म्हणून त्यासाठी 10,000/-रु द्यावे लागतील असे सांगितले. तसेच त्यांना दरमहा प्रोटोकॉल म्हणून 5,000/- रु ही द्यावे लागतील असे सांगितले. त्यावेळी पारठे साहेब हे माझे नजीकचे वरिष्ठ अधिकारी असल्याने व बीडीओ साहेबांना माझ्याबद्दल शिफारस करून सोनाट ग्रामपंचायतीचा अतिरिक्त चार्ज देतील असे मला वाटल्याने मी त्यांना नाईलाजाने होकार दिला. परंतू ते मागणी करीत असलेली रक्कम ही लाच असल्याची माझी खात्री झाली असून त्यांना लाच देण्याची माझी अजिबात इच्छा नाही.

तरी दिनांक 24/11/2025 रोजी मी पंचायत समिती, महाबळेश्वर येथे जावून सुनिल पारठे, विस्तार अधिकारी, यांची भेट घेणार असून त्यांचेशी मला सोनाट ग्रामपंचायतीचा अतिरिक्त चार्ज देणेबाबत तसेच दरमहा प्रोटोकॉलच्या नावाखाली मागणी करीत असलेल्या पैशाबाबत चर्चा करणार आहे. त्यामध्ये त्यांनी लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर आपले विभागामार्फत कायदेशीर कारवाई करावी ही विनंती आहे.

माझ्यात व सुनिल पारठे, विस्तार अधिकारी यांच्यात कोणत्याही प्रकारचा आर्थिक व्यवहार नाहीत. तसेच पुर्ववैमनस्य नाही. तरी पारठे साहेब हे मागणी करीत असलेल्या लाचे बाबत योग्य ती कारवाई करावी ही विनंती.

वगैरे मजकूरची तक्रार तक्रारदार यांनी स्वहस्ताक्षरात लिहून दिली नंतर सदरची तक्रार मी व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सह्या केल्या.

त्यानंतर मी तक्रारदार श्री विनोद खाडे यांचेकडे लोकसेवक सुनिल पारठे हे लाच मागणी करतात अगर कसे? याबाबतची पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविले. पडताळणीसाठी पंच क्र.1 म्हणून श्री राजु ईश्वरा शिंदे, पंच क्र.2 म्हणून श्री. सचिन दशरथ देशमुख हे काम पाहतील असे ठरविण्यात आले. त्यानंतर आम्ही खाजगी वाहन महिंद्रा टीयुव्ही क्रमांक एमएच 12 एमएल 9828 मधुन आम्ही,पंच व सापळा पथक असे सापळा कारवाईसाठी आवश्यक असलेल्या साहीत्यासह, तसेच तक्रारदार हे त्यांचे वाहनाने महाबळेश्वर करिता रवाना झालो. त्यावेळी आम्ही वाहने महाबळेश्वर येथील हॉटेल मेरिडीअन समोरील मोकळया जागेत उभी केली.

त्यानंतर तक्रारदार श्री विनोद खाडे यांना लोकसेवक सुनिल पारठे, विस्तार अधिकारी पंचायत समिती महाबळेश्वर, येथील पंचायत समिती महाबळेश्वर यांचेकडे लाच मागणी पडताळणी कामी पाठवण्याचे ठरले. त्यानंतर मी उपस्थित पंच साक्षीदार, तक्रारदार व सापळा पथकास पुढील पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या व त्यानंतर मी आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये SanDisk कंपनीचे 8 GB कार्ड त्याचे वरील बाजुस SanDisk micro SD HC 8GB व खालील बाजुस KKN8L09/25 MMCO8GBKH30-A8YB AX215F 2509 MADE IN TAIWAN कंपनीचे नवीन मेमरीकार्ड व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले. व्हॉईस रेकॉर्डर चालू

करून त्याबाबत माहिती दिली तसेच त्याचे इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे उपस्थित सर्वांची खात्री करून दिली.त्यानंतर तक्रारदार श्री खाडे व पंच क्र.1 श्री राजु शिंदे पंच क्र.02 श्री सचिन देशमुख यांचे पडताळणी निवेदन घेतले ती वेळ 16.34 वा ची होती. सदरचे निवेदन घेताना पोहवा चव्हाण यांनी त्यांचेकडील मोबाईलमध्ये व्हिडीओ चित्रीकरण केले असुन सदर चित्रीकरण मोबाईल मधील मेमरी कार्ड मध्ये सेव्ह करण्यात आले आहे. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो तक्रारदार खाडे यांनी परिधान केलेल्या शर्टच्या आतील बाजुस सेफटी पिन च्या सहाय्याने लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्र.01 श्री शिंदे यांचेसह पडताळणीकामी मेरेडिअन हॉटेल समोरील मोकळया जागेतुन येथुन तक्रारदार यांचे महिंद्रा एक्स यु व्ही 300 एमएच 11 डीए 1126 मधून पंचायत समिती महाबळेश्वर येथे रवाना केले. ती वेळ 16.38 वा ची होती. त्यावेळी मी सापळा पथक व पंच क्र. 2 असे मेरेडिअन हॉटेल समोरील मोकळे जागेत थांबून राहिलो.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी मी तक्रारदार यांचे अंगावरील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 18.15 वा.ची होती. त्यानंतर मी पंच क्र.01 श्री शिंदे यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की, तक्रारदार व लोकसेवक पारटे यांची पंचायत समिती महाबळेश्वर येथील कार्यालयामध्ये भेट झाली. त्यामध्ये तक्रारदार खाडे यांच्या कामाबाबत चर्चा झाली. सदर चर्चेदरम्यान तक्रारदार यांना लोकसेवक पारठे यांनी थांबण्यास सांगुन नंतर काही वेळाने तक्रारदार यांना भेटुन ते चुलती आजारी असुन मी तिकडे चाललो आहे असे सांगुन उदया फोन करतो असे सांगितलेने दि.24/11/2025 रोजीची सापळा कारवाई स्थगित केली व दि.25/11/2025 रोजी लोकसेवक पारठे यांचा फोन आलेवर पुढील कारवाई करणेचे नियोजीत केले. त्यानंतर दि.25/11/2025 रोजी लोकसेवक पारठे यांनी तक्रारदार यांना कोणताही कॉल आला नाही

त्यानंतर दि.26/11/2025 रोजी सकाळी 10.20 वाजता लोकसेवक पारठे यांनी तक्रारदार यांना फोन करून भेटावयास बोलविले असलेचे तक्रारदार यांनी आम्हास सांगीतले. त्यानंतर आज रोजी तक्रारदार यांना मेरेडिअन हॉटेल समोरील मोकळया जागेत येवुन थांबण्यास सांगुन आम्ही, पंच व सापळा पथक असे महींद्रा टीयुव्ही खाजगी वाहन क्रमांक एमएच 12 एमएल 9828 मधुन लाप्रवि कार्यालय सातारा येथुन महाबळेश्वर करिता रवाना झालो. महाबळेश्वर येथील मेरेडिअन हॉटेल समोरील मोकळया जागेत पोहचलो असता तक्रारदार हे तेथे हजर होते. तेव्हा पुन्हा तक्रारदार व पंच यांची ओळख करून दिली त्यानंतर त्यांचे सापळा पथकाशी ओळख करून दिली. त्याप्रमाणे पुन्हा दि.24/11/2025 रोजीप्रमाणेच आज पंच क्र.1 म्हणून श्री राजु ईश्वरा शिंदे, पंच क्र.2 म्हणून श्री. सचिन दशरथ देशमुख हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर तक्रारदार श्री विनोद खाडे यांना लोकसेवक सुनिल पारठे, विस्तार अधिकारी पंचायत समिती महाबळेश्वर, येथील पंचायत समिती महाबळेश्वर यांचेकडे लाच मागणी पडताळणी कामी पाठवण्याचे ठरले. त्यानंतर मी उपस्थित पंच साक्षीदार, तक्रारदार व सापळा पथकास पुढील पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या व त्यानंतर मी आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये दि.24/11/2025 रोजी पडताळणी कारवाईवेळी वापरले मेमरी कार्ड दाखविले त्यामध्ये दि.24/11/2025 रोजीचे पडताळणी कारवाईवेळीची एक फाइल सेव्ह असल्याचे दाखवुन सदरचेच मेमरीकार्ड आज पुन्हा पडताळणी कारवाई वेळी वापरण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर मी व्हाईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार श्री खाडे व पंच क्र.1 श्री राजु शिंदे पंच क्र.02 श्री सचिन देशमुख यांचे पडताळणी निवेदन घेतले ती वेळ 14.25 वा ची होती. तो तक्रारदार खाडे यांनी परिधान केलेल्या शर्टच्या आतील बाजुस सेफटी पिन च्या सहाय्याने लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्र.01 श्री शिंदे यांचेसह पडताळणीकामी मेरेडिअन हॉटेल महाबळेश्वर समोरील मोकळया जागा येथुन तक्रारदार यांचे महिंद्रा एक्स यु व्ही 300 एमएच 11 डी ए 1126 मधून पंचायत समिती महाबळेश्वर येथे रवाना केले. ती वेळ 14.29 वा ची होती. त्यावेळी मी सापळा पथक व पंच क्र. 2 असे मेरेडिअन हॉटेल बाहेरील मोकळे जागेत थांबून राहिलो.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी मी तक्रारदार यांचे अंगावरील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 15.21 वा.ची होती. त्यानंतर मी पंच क्र.01 श्री राजु शिंदे यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की, तक्रारदार व लोकसेवक पारठे यांची पंचायत समिती महाबळेश्वर या कार्यालयामध्ये भेट झाली. त्यावेळी तक्रारदार यांनी "साहेब नमस्ते"असे म्हणुन लोकसेवक पारठे यांचेशी चर्चा सुरु केली तेव्हा त्यांचेत तक्रारदार यांचे कामाबाबत चर्चा झाली. त्यावेळी तक्रारदार "सर ते सोनाटच्या चार्जच.. सोनाटचा चार्ज" असे म्हणाले त्यावर लोकसेवक पारठे "हे काय करायच ? तुम्हाला पाहिजे" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "तुम्ही म्हटला होत गेल्यावेळी .. तुम्ही म्हटला होता चार्ज " असे म्हणाले. त्यावर लोकसेवक पारठे हे "पलिकडे हाय ना नदीच्या पलीकडे एक दोन ग्रामपंचायती त्या बी ॲडीशन हाय त्या टाकतो " असे म्हणाले.

त्यावर तक्रारदार यांनी कामाबाबत चर्चा करुन "मला सोनाट एक तरी दया.. की" असे म्हणाले त्यावर लोकसेवक पारठे हे "सोनाट दिल तर सौदरी बी घ्यावी लागणार हाय" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "सोइस्कर..सोइस्कर दया की साहेब " असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व लोकसेवक पारठे यांनी त्यांचे कामाबाबत चर्चा केली. तेव्हा तक्रारदार "हो हो.. ऐका की मला सोनाट तेवढ तुम्ही करु शकता साहेब मी माझ्यासाठी किती महिने हो का जास्तीत जास्त दोन महिने मॅडमनी हो नाय केल तर चारच दिसात जाईल आण मॅडमन नाही केल तर एक महिना भर म्हणजे 31 डिसेंबर पर्यंत म्हणजे असा शेरा मारलाय तरी पण माझा प्रयत्न चालु हाय.. तुम्ही म्हणतील तो ही करा राहिला विषय प्रोटोकॉल पण करतो" असे म्हणाले. त्यावेळी तेथे ओंकार नावाचा इसम आला व तक्रारदार यांना "तुमच सगळ क्लोजींग असेल ना" असे म्हणाला. त्यावर तक्रारदार "आता काय करतो त्यात मी त्याला दिलय तीस तारखेपर्यंत त्या संदीपला देवुन महिना झाल त्याला त्यानी क्लोजींग केल नाही" असे म्हणाले. त्यावर ओंकार हा "पैसे कमी पडल्यात" असे म्हणाला त्यावर तक्रारदार "किती द्याचे" असे म्हणाले असता ओंकार हा "द्या हजार रुपये सगळे क्लोजींग वगैरे करून देईन.. पहिले पैसे दया म्हणजे ती पोरांना ॲडवान्स पगार नाही" असे म्हणाला. त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक पारठे यांचेशी कामाबाबत चर्चा केली तेव्हा लोकसेवक पारठे "बरोबर हाय की द्या की पैसे त्याला" असे म्हणुन ओंकार यास पैसे देण्यास सांगीतले. त्यावर तक्रारदार "देतो की पैसे त्याला मी नाय म्हणत नाय असे म्हणाले. त्यानंतर चर्चा करुन तक्रारदार "तुम्ही साहेबाना सांगितल तर साहेब ऐकल, तुमच्या हातात हाय सगळ" असे म्हणाले. तेव्हा लोकसेवक पारठे हे "ऐकणार पण दोन सोनाट आणि सौंदरी ते पण ॲडीशनल निघेल आणि भिमनगर तुमच्याकडेच मुळ राहील. आणि सौंदरीच अतिरिक्त राहील अस करू ते ही व्यवस्थित प्रोटोकॉल केला तर" असे म्हणाले. त्यावर

तक्रारदार “करतो, प्रोटोकॉल व्यवस्थित करतो साहेब” असे म्हणाले. तेव्हा लोकसेवक पारठे तक्रारदार यांना “तुम्हाला सांगायला पाहिजे का, सिनीयर माणूस तुम्ही” असे म्हणाले. त्यावर तक्रारदार “तुमच्या हयान” म्हणले तेव्हा लोकसेवक पारठे यांनी हाताचे बोटांनी एकादा दहाचा व परत एकदा पाच चा इशारा करुन 15,000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यावर तक्रारदार “त्यावर दहा हजार देतो तुमच्या प्रोटोकॉलचे ते म्हणजे प्रोटोकॉलचे पाच आणि प्रोटोकॉलचे, पाच साहेब देतो आणि चार्जाचे... का साहेबांना जास्त द्यावे लागतील” असे म्हणाले. त्यावर लोकसेवक पारठे हे “ते तुम्ही ठरवा की तुमच्या जवळचे हायत माझ्या पेक्षा साहेब बर चला...आता काय केल आताच” असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार लोकसेवक पारठे यांना “आव दोनच मिनीटात आलो, तुमी जावुन या” असे म्हणाले. त्यावेळी लोकसेवक पारठे हे त्यांचे कार्यासनावर जावुन बसले. त्यावेळी ओंकार हा पुन्हा तक्रारदार यांचेजवळ आला व त्याने कामाबाबत चर्चा करुन तक्रारदार यांना “काम किती क्लोजींग करायचे” त्यावर तक्रारदार “सहा काम हायती” असे म्हणाले तेव्हा ओंकार “सहा काम हायत का, दीड हजार रुपये घेणार” असे म्हणुन 1500/- रुपये लाचची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी ओंकार यास “ओके करणार ना?” असे विचारले असता लोकसेवक ओंकार याने “सगळ ओके करून देणार क्लोजींग मारूण ओके” असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांनी ओंकारशी कामाबाबत चर्चा करुन “देतो शंभर टक्के देतो तुमचे दीड हजार देतो, साहेबांचे पण प्रोटोकॉल ठरले आहेत, चार्जाचे पण ठरले आहेत, ते दोन्ही पण देतो, माझ काम झाल पाहिजे” असे म्हणुन त्यांची चर्चा झाल्यानंतर मी व तक्रारदार त्यांचेकडील चारचाकी वाहनाने आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो. वगैरे हकीकत सांगितली. त्यानंतर तक्रारदार श्री खाडे यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता तक्रारदार श्री खाडे यांनी पंच क्र.01 शिंदे यांचेप्रमाणे हकिकत सांगितली. त्यावेळी मी तक्रारदार खाडे यांना ओंकार कोण आहे याबाबत विचारणा केली असता ओंकार हा ब्लॉक मॅनेजर असुन तो पंचायत समितीमध्ये नोकरीस असल्याचे सांगीतले तसेच त्याचे नाव ओंकार जाधव असल्याचे सांगीतले. त्यावेळी लोकसेवक ओंकार जाधव यांनी दप्तर क्लोजींग करण्यासाठी पैशाची मागणी केली असुन सदर कामाबाबत तक्रारदार यांना माहीती विचारली असता तक्रारदार यांनी ग्रामपंचायत कडील जमा खर्च किर्द ग्रामपंचायत विभागाचे पोर्टल वर प्रत्येक महीन्यास भरुन ते महीना अखेरीस क्लोज केले जाते तेव्हा पुढील महीन्याची किर्द ऑनलाईन सुरु होते. सदर काम डाटा एंन्ट्री ऑपरेटर यांचेकडुन केले जाते त्यांचेवर ब्लॉक मॅनेजर म्हणुन ओंकार जाधव काम करत असल्याचे सांगीतले. सदर काम करण्यासाठी पैसे लागत नाहीत ओंकार जाधव यांनी बेकायदेशीर पणे पैशाची मागणी केली आहे. त्यानंतर मी व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकून ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली. त्यानंतर मी तक्रारदार श्री विनोद खाडे यांना लोकसेवक सुनिल पारठे व लोकसेवक ओंकार जाधव यांनी लाच रक्कम कधी व कुठे घेवून येण्यास सांगितले आहे अशी विचारणा करता तक्रारदार श्री विनोद खाडे यांनी सांगितले की, लोकसेवक पारठे व लोकसेवक ओंकार जाधव यांनी लागलीच पैसे घेवून येण्यास सांगितले आहे.

एकंदरीत तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीप्रमाणे लोकसेवक पारठे यांचेकडे दि.26/11/2025 रोजी तक्रारदार यांना पडताळणी कामी पाठवले असता सदर पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांना अतीरिक्त ग्रामपंचायतीचा चार्ज देणेसाठी तसेच दरमहा प्रोटोकॉल म्हणुन लोकसेवक सुनिल पारठे

विस्तार अधिकारी पंचायत समिती महाबळेश्वर यांनी तक्रारदार यांचेकडे 15,000/- रुपये लाचेची मागणी केली. तसेच आरोपी लोकसेवक औंकार जाधव यांनी दफ्तर क्लोजींगसाठी 1500/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झालेने सापळा कारवाईचे नियोजन करण्यात आले.

त्यानंतर मी दोन्ही पंचांना व तक्रारदार श्री खाडे यांना सापळापुर्व पंचनामा कारवाई सुरू करण्यात येत असल्याबाबत सांगितले. त्यानंतर आमचे सुचनेनुसार तक्रारदार खाडे यांना दोन्ही पंचांसमक्ष लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी त्यांचेकडील लाच रक्कम 16,500/- रुपये हजर केले. त्यामध्ये 500 रु दराच्या 33 चलनी नोटा होत्या. त्यानंतर पोहवा चव्हाण यांनी लोकसेवक पारठे यांना देण्यासाठी हजर केलेल्या नोटांचे नंबर एका कागदावर व लोकसेवक औंकार जाधव यांना देण्यासाठी हजर केलेल्या नोटांचे नंबर एका कागदावर लिहुन काढले. त्यानंतर मी तात्काळ सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरवले. मी दोन्ही पंचांना पडताळणी व सापळा कारवाई यशस्वी झाल्यास लोकसेवकाची अंगझडती व लाचेची रक्कम जप्त करण्याच्या कारवाईचे चित्रीकरण पडताळणी कारवाई निवेदन व्हिडीओ रेकॉर्डिग केलल्या मोबाईलमध्ये करण्यात येणार असुन सदर चित्रीकरण मोबाईल मधील मेमरी कार्ड मध्ये सेव्ह करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर मी दोन्ही पंचांना व तक्रारदार श्री खाडे यांना अन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. तसेच सापळा पथकाचे मदतीने खाजगी वाहनाचे काळया पडदयाचे सहाय्याने खिडक्या बंद केल्यानंतर कृत्रीम अंधारात त्याचे प्रात्यक्षिक पोहवा/1069 गोगावले यांनी करून दाखवले. त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेली लाच रक्कम पोहवा/1069 गोगावले यांना अॅन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिली असता, पोहवा/1069 गोगावले यांनी कापसाच्या बोळयाने सगळया चलनी नोटांच्या दोन्ही बाजूस अॅन्थ्रासीन पावडर लावली व त्यांनतर पोहवा/1069 गोगावले यांनी सदर लाचेच्या रकमेतील 15,000/- रुपये तक्रारदार श्री खाडे यांचे शर्टाचे वरील डाव्या बाजुच्या खिशात तसेच 1500/- रुपये जॅकेटच्या खिशात ठेवुन दिली. त्यानंतर पोहवा गोगावले यांना सापळा पथकातुन वगळण्यात आले.

त्यानंतर मी पंचांना, तक्रारदार व सापळा पथकातील पोलीस अंमलदार यांना सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून त्यांना योग्य त्या प्रमाणे सूचना दिल्या. त्याचवेळी तक्रारदार यांनी लोकसेवक पारठे व लोकसेवक औंकार जाधव यांना लाच रक्कम दिल्यानंतर डावा हात डोक्याचे केसावरुन दोनदा फिरवण्याचा पुर्वनियोजीत इशारा ठरविण्यात आला.

त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये प्रथम तक्रारदार श्री खाडे त्यानंतर पंच क्र.01 श्री शिंदे व पंच क्र.02 देशमुख यांचे सापळा निवेदन ध्वनीमुद्रीत केले ती वेळ 16.43 वा ची होती. सदरचे निवेदन घेताना पोहवा चव्हाण यांनी त्यांचेकडील मोबाईलमध्ये व्हिडीओ चित्रीकरण केले असुन सदर चित्रीकरण मोबाईल मधील मेमरी कार्ड मध्ये सेव्ह करण्यात आले आहे.

त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांनी परीधान केलेल्या शर्टचे आतील बाजूस सेफ्टी पिनच्या सहाय्याने लाऊन देऊन तक्रारदार यांना पंच क्र.01 श्री शिंदे यांचे सह 16.48 वा.चे सुमारास त्यांचे महिंद्रा एक्स यु व्ही 300 एमएच 11 डीए 1126 मधून लोकसेवक सावंत यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता पंचायत समिती महाबळेश्वर येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच क्र.02 व सापळा पथक असे सापळा कारवाई कामी लागणाऱ्या आवश्यक साहित्यासह खाजगी वाहनाने तक्रारदार यांचे पाठोपाठ निघालो व पंचायत समिती महाबळेश्वर कार्यालयाचे

पाठीमागील बाजूस वाहन उभे करून कार्यालयाचे आवारात कोणासही संशय येणार नाही अशा रितीने थांबून राहिलो.
तक्रारदार व पंच क्र.01 हे लोकसेवक यांचे कार्यालयात गेले व काही वेळाने तक्रारदार हे कार्यालयातुन बाहेर आल्यानंतर तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्वनियोजित इशारा केला असता आम्ही व सापळा पथक असे पंचायत समिती महाबळेश्वर येथे आलो. त्यावेळी आमचे सुचनेवरून पोहवा/1869 राजपुरे यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 17.11 वाची होती. त्यानंतर यापूर्वी सुचना दिलेप्रमाणे पोहवा चव्हाण यांनी व्हिडीओ चित्रीकरण सुरु केले. त्यावेळी मी तक्रारदार यांना लाच रक्कम कोणी स्विकारली असे विचारले असता तक्रारदार यांनी एका इसमाकडे बोट दाखवुन हे लोकसेवक पारठे असल्याचे सांगितले तेव्हा मी पोहवा राजपुरे यांना लोकसेवक पारठे यांना अटकावुन ठेवण्यास सांगितले. त्यानंतर मी तक्रारदार यांना लोकसेवक जाधव हे कोठे आहेत असे विचारले असता त्यांनी इमारतीचे दुस-या मजल्यावरील एका कार्यालयात नेहुन एका इसमाकडे बोट दाखवुन हे लोकसेवक जाधव असल्याचे सांगितले तेव्हा माझे सुचनेवरुन पोकॉ देशमुख यांनी लोकसेवक जाधव यांना अटकावुन ठेवले. त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेवक पारठे यांनी लाच रक्कम कुठे ठेवली याबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगितले की, मी माझ्याकडील खिशात ठेवलेली अँथ्रासीन पावडर लावलेली 15,000/- रु लाच रक्कम शर्टचे खिशातुन उजव्या हाताने काढून लोकसेवक पारठे यांचे पुढे धरली असता, त्यांनी ती घेवुन त्यांचे पॅन्टचे डाव्या खिशात ठेवली आहे. सदरवेळी माझे सुचनेवरुन पंच नंबर 2 यांनी लोकसेवक पारठे यांचेकडुन 15,000/-रुपय लाच रक्कम ताब्यात घेतली. पंच नं 2 श्री देशमुख यांनी नोटांचे नंबर हे त्यांचेकडील कागदावर लिहिलेल्या नंबरशी पडताळून पाहिले असता ते तंतोतंत जुळून आले. त्यानंतर लोकसेवक पारठे यांचे ऑफिसमध्ये लाईट बंद करून कृत्रिम अंधारामध्ये लोकसेवक पारठे यांचेकडून हस्तगत केलेली लाच रक्कम व त्यांचे अंगावरील पॅन्ट व त्यांचे दोन्ही हातांची अल्ट्रा व्हायोलेट दिव्याच्या प्रकाशात पंचासमक्ष तपासणी केली असता लोकसेवक पारठे यांचे डाव्या हातास पुढील बाजूस निळसर रंगाची चकाकी दिसून आली. तसेच हस्तगत केलेल्या लाच रक्कम 15,000/- रुपयेच्या चलनी नोटांवर व लोकसेवक पारठे यांचे अंगावरील पॅन्टचे डाव्या खिशाला अँथ्रासीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसून आली. तसेच पंच नंबर 2 यांचे हातासही अँथ्रासीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसून आली.
त्यानंतर आम्ही लोकसेवक ओंकार जाधव यांचेजवळ जावुन लाच रकमेबाबत तक्रारदार यांना विचारणा केली असता त्यांनी सांगीतले की, मी माझ्याजवळील 1500/-रुपये लाच रक्कम लोकसेवक ओंकार जाधव यांचे केबीनमध्ये जावुन त्यांना दिली असता त्यांनी ती त्याचे पॅन्टचे उजव्या खिशात ठेवली आहे. सदरवेळी माझे सुचनेवरुन पंच नंबर 2 यांनी लोकसेवक जाधव यांचेकडुन 1500/-रुपये लाच रक्कम ताब्यात घेतली. मी पंच क्र. 2 श्री देशमुख यांना त्यांचे जवळील सापळा पुर्व कारवाई दरम्यानचे नोटांचे नंबर लिहून दिलेल्या कागदावरील नंबर एकच आहेत का? याबाबत खात्री करण्यास सांगितले. त्याप्रमाणे पंच नं 2 श्री देशमुख यांनी नोटांचे नंबर हे त्यांचेकडील कागदावर लिहिलेल्या नंबरशी पडताळून पाहिले असता ते तंतोतंत जुळून आले. त्यानंतर लोकसेवक जाधव यांचे कक्षातील लाईट बंद करून कृत्रिम अंधारामध्ये लोकसेवक जाधव यांचेकडून हस्तगत केलेली लाच रक्कम व त्यांचे अंगावरील पॅन्ट व त्यांचे दोन्ही हातांची अल्ट्रा व्हायोलेट दिव्याच्या प्रकाशात

पंचासमक्ष तपासणी केली असता लोकसेवक जाधव यांचे उजव्या हातास पुढील बाजूस निळसर रंगाची चकाकी दिसून आली. तसेच हस्तगत केलेल्या लाच रक्कम 1500/- रुपयेच्या चलनी नोटांवर व लोकसेवक जाधव यांचे अंगावरील पॅन्टचे उजव्या खिशाला अँथ्रासीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसून आली. तसेच पंच नंबर 2 यांचे हातासही अँथ्रासीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसून आली.

त्यानंतर सापळा पंचनाम्याची पुढील कारवाई शासकीय विश्रामगृह महाबळेश्वर येथे जावून करण्याचे सर्वानुमते निश्चित केले. शासकीय विश्रामगृह महाबळेश्वर येथे आम्ही पंच नंबर 1 यांना घडलेल्या हकीकतीविषयी विचारणा केली असता त्यांनी सांगीतले की, मी व तक्रारदार तक्रारदार यांचे चारचाकी वाहनातुन पंचायत समिती महाबळेश्वर येथे गेलो तेव्हा तक्रारदार लोकसेवक पारठे याना "साहेब, पारठे साहेब" असे म्हणाले. त्यावर लोकसेवक पारठे साहेब "बोलवत होते म्हणून आलो होता साहेबांचा, फोन आलाय" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व लोकसेवक पारठे यांचेत कामाबाबत चर्चा झाली त्यावेळी तक्रारदार खाडे "मी सांगतो संघटनेला, तुमच्या म्हणण्याप्रमाणं केलयं, पण तुमच्या पाया पडतो फक्त सोनाट, ऐका की जायचा यायचा लय त्रास व्हतुय साहेब" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी लाच रक्कम काढुन लोकसेवक पारठे यांचे समोर धरली असता लोकसेवक पारठे यांनी "किती हेत " असे विचारले त्यावर तक्रारदार "पंधरा हायतं" असे म्हणाले व "पंधरा हायतं, बरोबर, दहा सोनाटच दिल्यात, आण पाच प्रोटोकॉल केलाय तुमचा " असे म्हणाले त्यावेळी लोकसेवक पारठे यांनी तक्रारदार यांचेकडील 15,000/- रुपये लाच रक्कम घेवुन स्वत:चे पॅन्टचे डाव्या खिशात ठेवुन दिली. त्यानंतर मी व तक्रारदार लोकसेवक जाधव यांचेकडे गेलो तेव्हा तक्रारदार त्यांना "ओंकार,ओंकार, ओंकार, दफ्तर उदया सकाळी तुला देतो, उदया सकाळी देतो तुला, मला क्लोज पाहीजे आणि पेमेंट सोडून पाहिजे " असे म्हणाले. त्यावर लोकसेवक जाधव "क्लोज आणि पेमेंट सोडून तुम्हाला" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व लोकसेवक जाधव यांचेत कामाबाबत चर्चा झाली त्यावेळी तक्रारदार यांनी 1500/- रुपये लाच रक्कम काढुन लोकसेवक जाधव यांचे समोर धरली असता लोकसेवक जाधव यांनी तक्रारदार यांचेकडील 1500/- रुपये लाच रक्कम घेवुन स्वत:चे पॅन्टचे उजव्या खिशात ठेवुन दिली. त्यानंतर तक्रारदार यांनी कार्यालयाचे बाहेर येवुन डोक्याचे केसावरुन डावा हात दोन वेळा फिरवुन लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने लोकसेवक पारठे व लोकसेवक जाधव यांना ताब्यात घेतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना हकीकत विचारता त्यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली.

तरी यातील तक्रारदार श्री विनोद भिमराव खाडे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि. 24/11/2025 व दि.26/11/2025 रोजी पंचासमक्ष पडताळणी कारवाई करण्यात आली असुन दिनांक 26/11/2025 रोजीच्या पडताळणी कारवाईवळी तक्रारदार श्री. विनोद भिमराव खाडे वय-48 वर्षे व्यवसाय-ग्रामपंचायत अधिकारी, भिमनगर महाबळेश्वर रा. दहिवडी रोड, वडुज ता. खटाव जि. सातारा यांना लोकसेवक क्र. 1) सुनिल संभाजी पारठे वय-57 वर्षे पद- विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती महाबळेश्वर ता.महाबळेश्वर जि.सातारा रा. 8/2 नंबर अंबिका हौ.सोसायटी ,महाबळेश्वर मुळ रा. मु.पो.मांघर ता.महाबळेश्वर जि.सातारा यांनी तक्रारदार यांना बीडीओ यांना सांगुन अतीरिक्त ग्रामपंचायतीचा चार्ज देणेसाठी तसेच दरमहा प्रोटोकॉल या नावाखाली तक्रारदार

यांचेकडे पंच नंबर 1 यांचेसमक्ष 15,000/- रु लाचेची मागणी करुन सापळा कारवाईवेळी पंचायत समिती, महाबळेश्वर येथे तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष 15,000/- रुपये लाच स्विकारली आहे. तसेच तक्रारदार यांना लोकसेवक ओंकार जाधव यास लाच रक्कम देणेस प्रोत्साहन दिले आहे. म्हणुन त्यांनी बेकायदेशीर, अप्रामाणिकपणे आर्थिक गैरफायदा मिळविला तसेच तक्रारदार यांना लाच रक्कम देणेस प्रोत्साहन दिले म्हणून त्यांनी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7, 12 प्रमाणे अपराध केला आहे. तसेच लोकसेवक क्रमांक 2) ओंकार संतोष जाधव वय-27 वर्षे पद-तालुका व्यवस्थापक (ब्लॉक मॅनेजर) आपले सरकार सेवा केंद्र,पंचायत समिती महाबळेश्वर ता.महाबळेश्वर जि.सातारा रा.मु.चिखली ता.महाबळेश्वर जि.सातारा यांनी दिनांक 26/11/2025 रोजीच्या पडताळणी कारवाईवळी तक्रारदार विनोद खाडे यांचेकडे दफ्तर क्लोजींगसाठी पंच नंबर 1 यांचेसमक्ष 1500/- रुपये लाचेची मागणी करुन सापळा कारवाईवेळी पंचायत समिती, महाबळेश्वर येथे तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष 1500/- रुपये लाच रक्कम स्विकारुन त्यांने बेकायदेशीर, अप्रामाणिकपणे आर्थिक गैरफायदा मिळविला म्हणून त्यांनी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे अपराध केला आहे. म्हणुन माझी त्यांचे विरोधात कायदेशीर फिर्याद आहे. माझा वरील खबरी जबाब माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखित करण्यात आला असून तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Bapusaheb Popat Sandhbhor (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):** **or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Bapusaheb Popat Sandhbhor

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** PI2005

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1968 | | - | | **चेचक:** क्र. |
| 2 | पुरुष | 1998 | | - | | **चेचक:** क्र. |

| Deformities / Peculiarities (व्यंग वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)**